सकाळ

# नाळेगावला टूथब्रशचे वाटप

**सकाळ वृत्तसेवा**

दिंडोरी, ता. २२ : तालुक्यातील नाळेगाव येथे स्वप्नपूर्ती एज्युकेशनल व सोशल वेल्फेअर, नाशिक यांच्या अंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची मोफत दंतचिकित्सा केली.

संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अनुराधा गाडेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करत विद्यार्थ्यांना एक-एक ब्रशचे वाटप केले. त्यांनी दातांची निगा कशी राखावी, दात किती वेळ घासावेत, दुधाचे दात व कायम दात यामधला फरक स्पष्ट केला. दात घसण्याचे प्रात्यक्षिकही करून दाखविले. संस्थेचे सचिव अनिरुद्ध पिंपळे, भार्गव गाडेकर उपस्थित होते. मुख्याध्यापक किशोर गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक किशोर गायकवाड, शिक्षक सचिन वडजे, बलराम माचरेकर, शांताराम नागारे, सुंदर ठाकरे यांचे सहकार्य मिळाले.



**नाळेगाव : मोफत दंतचिकित्सा कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक.**



Scanned with Oken Scanner